# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.
## नगरसचिव कार्यालय

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकाराचा वापर करुन मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक १६/०५/२०२३ चे ठराव**

**ठराव क्रमांक -३३१** | **विषय क्रमांक –३३१**
**दिनांक- १६/०५/२०२३** | **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३३१**<br>**दिनांक-१६/०५/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.शि.वि/६/कावि/३००/२०२३ दि.०३/०४/२०२३ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्रमांक १५०८ दि.५/४/२०२३ अन्वये, मनपा प्राथमिक शाळांमध्ये कार्यरत असलेल्या मानधनावरील ७७ सफाई सेवक व १ निवासी रखवालदार यांना किमान वेतन प्रति तास दराने वेतन देणेबाबत. |
| **ठराव क्र. ३३१**<br>**दिनांक-१६/०५/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.शि.वि/६/कावि/३००/२०२३ दि.०३/०४/२०२३ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्रमांक १५०८ दि.५/४/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अंतर्गत प्राथमिक शिक्षण विभाग कार्यरत आहे. प्राथमिक शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखाली एकूण १०५ शाळा असून त्या ८५ इमारतीमध्ये सुरू आहेत. पिपरी चिंचवड महापालिकेमध्ये पूर्वी शिक्षण मंडळ कार्यरत असताना परिपत्रक क्र. शिक्षण/अस्था/कावि/६७१/२००४, दि.३०/१२/२००४ अन्वये शाळांमधील शालेय स्वच्छता करणेकामी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांच्या अधिनस्त प्रतीमाहे र.रु.२०००/- पर्यंत अनुदान शिक्षण मंडळामार्फत मुख्याध्यापकांच्या बँक खात्यावर वितरीत करणेत येत होते. सदर अनुदानातून आवश्यक योग्य प्रकारचे मनुष्यबळ उपलब्ध करून घेऊन स्वच्छता ठेवणेची जबाबदारी मुख्याध्यापकांवर निश्चित करणेत आलेली होती. मुख्याध्यापकांमार्फत एकुण १०५ शाळा मधील एकुण ८५ इमारतीमध्ये सद्यस्थितीत एकूण ७७ सफाई सेवक प्रति माहे २००० /- व १ निवासी रखवालदार प्रती माहे र.रु.३००० /- या अनुदानावर शाळेवर काम करत आहे. सदर सफाई सेवकांकडून शाळांची दैनंदिन स्वच्छतेचे कामकाज करून घेण्यात येत होते. प्राथमिक शाळेत शिपाई कर्मचारी नसल्याने शाळेमधील साफसफाई, हजेरीची नोंद घेणे, परीपत्रक फिरवणे, शालेय पोषण आहाराचे वाटप करणे, बेल वाजवणे इत्यादी कामकाजाकरीता शाळेवर मुख्याध्यापकांना मदतनीस म्हणून या कर्मचा-यांची अर्धवेळ आवश्यकता आहे. त्यामुळे ८५ इमारतीमध्ये आवश्यकतेनुसार किमान वेतनावर तात्पुरत्या स्वरूपात ६ महिने कालावधीकरीता वरिष्ठांच्या तोंडी सुचनेनुसार व मुख्याध्यापकांच्या हजेरी अहवालानुसार सदर सफाई कर्मचा-यांची अर्ध वेळ नेमणूक करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत एकूण ७७ सफाईसेवक व १ निवासी रखवालदार विविध शाळेवर कामकाज करीत असल्याने त्यांना ६ महिने कालावधीकरीता मुख्याध्यापकांच्या आवश्यकतेनुसार शाळेच्या साफसफाईचे कामकाजाकरिता कामगार कल्याण यांचे जा.क्र.काक/३/कावि/९३/२०२३ दि.१३/०२/२०२३ च्या अभिप्राय नुसार व महाराष्ट्र शासन, उद्योग विभागाकडील दि.२४ फेब्रुवारी २०१५ रोजीच्या अधिसूचनेनुसार अर्धवेळ काम करणा-यां कामगारांना देय असलेल्या प्रति तास किमान |

| | |
|---|---|
| | वेतनाचा दर तो कामगार ज्या वर्गवारीचा असेल त्या वर्गवारीच्या रोजंदारी किमान वेतनास ८ तासाने भागून व त्यात १५% वाढ करून त्यास येणारी रक्कम पैशापर्यंत पुर्णाकात परिवर्तन करून व कामगार कल्याण यांचे पत्र क्र.काक/३/कावि/०७/२०२३ दिनांक ०३/०१/२०२३ रोजीचे पत्रानुसार विशेष भत्त्याचे दर प्राप्त झाले असून त्यानुसार सुधारीत वेतन देणे आवश्यक आहे. शाळांच्या सुट्टीच्या कालावधी मधील वेतन संबंधिताना कर्मचा-यांना अनुज्ञेय राहणार नाही, त्याच प्रमाणे ६ महिने पूर्ण होताच त्यांना १ दिवसाचा ब्रेक देऊन पुढील सहा महिने मुख्याध्यापकांच्या आवश्यकतेनुसार व शिफारशीनुसार मुदत वाढ देणे उचित होईल. त्याच प्रमाणे मुख्याध्यापकांनी सफाई सेवकांना विभागाने दिलेल्या आदेश व नियमानुसार विहित तासांमध्ये अर्धवेळ कामकाज करून घेणे बंधन कारक राहील व कामकाज ठरून दिलेल्या तासांचे कामकाज करून घेणे बंधन कारक राहील व केलेल्या कामाची हजेरी कार्यालयात पाठविणेची जबाबदारी मुख्याध्यापकांची राहील. सदरच्या रक्कमा पूर्वीच्याच कार्यपध्दतीनुसार मुख्याध्यापकांच्या बँक खात्यावर अदा करणेकामी धोरणात्मक बाब म्हणून मा.आयुक्त सो. यांची मान्यता घेणे आवश्यक आहे. सफाई सेवक किमान वेतन प्रती तास दराने वेतन अदा करणेस प्रत्यक्ष येणा-या खर्चास व प्रथम नेमणुकीस मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**ठराव क्रमांक -३३२** — **विषय क्रमांक –३३२**

**दिनांक- १६/०५/२०२३** — **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३३२**<br>**दिनांक-१६/०५/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.स्था/नि/उद्यान/१४७/२०२३ दि.२८/०४/२०२३ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्रमांक १६३५ दि.२/५/२०२३ अन्वये, मनपाचे स्थापत्य उद्यान व क्रीडा विभागाकडील तरतुदीतील वाढ घट करणेबाबत. |
| **ठराव क्र. ३३२**<br>**दिनांक-१६/०५/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.स्था/नि/उद्यान/१४७/२०२३ दि.२८/०४/२०२३ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्रमांक १६३५ दि.२/५/२०२३ अन्वये, पिंपरी चिंचवड मनपाच्या स्थापत्य उद्यान व क्रीडा विभागाकडील सन २०२३-२४ च्या मूळ अंदाजपत्रकात कामांची तरतूद वर्ग करणेची आवश्यकता असल्याने खालीलप्रमाणे वाढ घट करणेचा प्रस्तावास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |

| अ.क्र | कामाचे नाव | पान | अ.क्र. | बजेट कोड | लेखा शिर्ष | अंदाज पत्रकीय रक्कम | सन २३-२४ चा अंदाज | वाढ | घट | सन २०२३-२४ची सुधारित तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१८ मध्ये बहुउद्देशीय स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स बांधणे | 43 | 8 | 22230122 0 | Park and Play ground | 110000000 | 1000 | 25000000 | 0 | 25001000 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | चिखली मैलाशुद्धीकरण केंद्राचे उर्वरित जागेत आकर्षक लँडस्केपिंग उद्यान विकसित करणे | 222 | 66 | 22230511 5 | स्थापत्य उद्याने | 50000000 | 2300000 | 0 | 2300000 | 0 |
| ३ | फ प्रभागांमध्ये मातीचे ट्रॅक / जॉगिंग ट्रॅक तयार करणे व अनुषंगिक विद्युत व स्थापत्य विषयक कामे करणे | 223 | 10 9 | 22230530 6 | स्थापत्य उद्याने | 50000000 | 2100000 | 0 | 1200000 | 900000 |
| ४ | प्रभाग क्र.१५ मधील गणेश तलाव उद्यान येथे स्थापत्य विषयक सुधारणांची कामे करणे | 224 | 12 4 | 22230534 2 | स्थापत्य उद्याने | 20000000 | 8412000 | 0 | 8400000 | 12000 |
| ५ | पिंपळे सौदागर येथे गिर्यारोहणासाठी क्लायम्बीग वॉल बांधणे | 237 | 3 | 22231336 0 | क्रीडा विषयक कामे | 100000000 | 37500000 | 0 | 6200000 | 31300000 |
| ६ | पिंपरी प्र.क्र.२१ मधील आरक्षण क्र.१७३ येथे खेळाचे मैदान विकसित करणे | 240 | 60 | 22230565 0 | क्रीडा विषयक कामे | 150000000 | 5000000 | 0 | 5000000 | 0 |
| ७ | अ ब क ड फ इ ग ह प्रभागातील उद्यानांची रनिंग,अंतिम व भाववाढ फरकाची बिले अदा करणे. | 230 | 69 | 23240173 8 | स्थापत्य उद्याने | 5000000 | 2500000 | 0 | 1900000 | 600000 |
| | एकुण = | | | | | | 57813000 | 25000000 | 25000000 | 57813000 |

| | |
|---|---|
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**ठराव क्रमांक-३३३** **विषय क्रमांक –३३३**

**दिनांक- १६/०५/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३३३**<br>**दिनांक-१६/०५/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.स्था/प्रकल्प/५३१/२०२३ दि.९/५/२०२३ अन्वये, रावेत येथील रेल्वे उड्डाणपुलालगत असलेला सेवा रस्ता विकसीत करणे व अनुषंगिक कामे करणे या कामास सुधारीत मान्यता मिळणेबाबत. |
| **ठराव क्र. ३३३**<br>**दिनांक-१६/०५/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.स्था/प्रकल्प/५३१/२०२३ दि.९/५/२०२३ अन्वये, भक्ती शक्ती ते मुकाई चौक या रस्त्यावर निसर्गदर्शन सोसायटी जवळ रेल्वे लाईनवर पूल बांधण्याचे काम चालू असून त्या पुलाच्या बाजूचे सेवा रस्ता विकसित करण्याचे काम मे.बहीरट ब्रदर्स यांचे मार्फत चालू आहे. या सेवा रस्त्याचे रावेत बाजूला रस्त्याचे जागेचे भूसंपादन व उच्च दाब विद्युत वाहिनीच्या स्थलांतराचे काम प्रलंबित होते. सदरचे भूसंपादन व उच्च दाब विद्युतवाहिनी स्थलांतरित करण्याचे काम व रस्त्याचे भूसंपादनाचे काम पूर्ण झाले आहे. त्यानुसार रेल्वे लाईन वर पुलाचे काम सुरू झाले आहे. सदर पुलाचे काम पूर्ण होईपर्यंत रावेत बाजूकडील सेवा रस्त्याचे काम व पूल संपल्यानंतर त्यापुढे सुमारे ३०० मीटर लांबीचे |

| | |
|---|---|
| | मुख्य रस्त्याचे काम स्ट्रॉर्म वॉटर सह करणे आवश्यक आहे. सदरच्या उर्वरीत करावयाच्या कामास सन २०२२-२३ चे दरसुचीनुसार अंदाजे र.रु.१०.७८ कोटी (अधिक करासह) इतका खर्च येत आहे. सदर पुलाचे जागेबाबत संबंधित जागा मालकाने न्यायालयात दाद मागितली असुन त्याबाबत सुनावणी सुरु आहे. सदर ठिकाणी न्यायालयाचे जैसे थे चे आदेश होण्याची शक्यता नाकरता येत नाही. तसेच सदर ठिकाणी हि काळया मातीची शेत जमिन असुन त्या ठिकाणी पावसाळयामध्ये काम करता येणे शक्य नाही. या बाबींचा विचार करता सदर ठिकाणी रस्त्याचे उर्वरीत काम त्वरीत चालु करुन पावसाळयापुर्वी पुर्ण करणे गरजेचे आहे. सदर उर्वरीत कामाची निविदा काढुन काम करावयाचे झालेस किमान २ ते ४ महिन्याचा कालावधी काम सुरु करणे करीता लागणार आहे. वरील सर्व गोष्टींचा विचार करता विषयांकित कामातुन उर्वरीत रत्याचे काम करणे आवश्यक वाटते. विषयांकित काम हे सन २०१८-१९ च्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुचीनुसार  दर वापरुन अंदाजपत्रक तयार करणेत आले होते त्याचा निविदा दर ८.८८%कमी आहे व उर्वरीत कामाचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१८-१९ दरसुचीनुसार अंदाजपत्रक तयार केले असता त्याची एकुण अंदाजपत्रकीय र.रु. ११,६४,१७,०००/- इतकी प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक असुन त्यानुसार सुधारित तांत्रिक मान्यता घेण्यात येईल.<br><br>उपरोक्त कामासाठी होणा-या र.रु.११,६४,१७,०००/- च्या सुधारित प्रशासकीय मान्यता आवश्यक असल्याने मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका  सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

सही/-
(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**